**आतील पानात**

- मुंबईकरांचा प्रवास होणार अधिक सुखकर दहिसर ते काशिगाव मेट्रो चाचणीला सुरुवात
- अंमली पदार्थ विरोधी पथक परिमंडल ०३ ॲक्शन मोडवर

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २७३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरूवार, दि. १५ मे २०२५


## थोडक्यात

### देवदर्शन करून परतणाऱ्या वैज्ञानिकासह सेवानिवृत्त शिक्षक वडील व आईचा अपघातात मृत्यू; २ गंभीर ३ किरकोळ जखमी



**अक्षराज : आकाश जयस्वाल**

**दि.१४, माहूर (नांदेड) :** उज्जैन येथून देवदर्शन आटोपून गावाकडे परत जात असताना राष्ट्रीय महामार्ग क्रं ५३वरील खामगाव बायपासच्या खातखेड फाट्याजवळ रस्त्यावर तांत्रिक बिघाड झाल्याने बंद पडलेल्या ट्रकवर मागून भरधाव वेगाने येणारी इर्टीगा कार धडकून झालेल्या भीषण अपघातात गाडीतील तीन जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी तसेच तीन जण किरकोळ जखमी झाल्याची घटना १३मे च्या उत्तररात्री १.४८ वाजे दरम्यान घडली.

याबाबत नांदुरा पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी निलेश आंदुसिंग राठोड क्य ४२वर्षे रा नाईक नगर हेटी तालुका आर्णी जि यवतमाळ यांनी नांदुरा पोलीस ठाण्यात दिलेल्या लेखी तक्रारीत नमूद केले आहे की त्यांचे नातेवाईक पांढऱ्या रंगाची इर्टीगा कार क्रं एम एच २६-सि इ- ६२४५ ने उज्जैन येथून देववर्शन करून गावाकडे परत येत असताना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील खामगाव बायपासच्या खातखेड फाट्याजवळ अशोक लेलैंड कंपनीचा ट्रक क्रं एम पी-०९-डि एम-१३६२ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रकच्या टायरचा रिमोट पट्टा निघाल्याने कोणतीही सुरक्षितता न बाळगता तसेच इंडिकेटर न लावताच सदरचे वाहन निष्काळजीपणे रस्त्याच्या मध्यभागी लावले असल्याने मागून भरधाव वेगाने येणाऱ्या इर्टीगा चालकाला बंद पडलेल्या ट्रकचा अंदाज न आल्याने कार ट्रक वर जाऊन आदळली ही थडक एवढी भीषण होती की गाडी समोरुन पूर्णपणे चकनाचूर झाली या अपघातात गाडीतील सेवानिवृत्त शिक्षक देवराव गंगाराम पवार वय ६०वर्ष, बबीता देवरात पवार वय ५५वर्षे, नव रुजू इस्रो वैज्ञानिक निकेतन देवराव पवार वय २६ वर्षे रा लोकरवाडी ता माहूर जि नांदेड हे तिघे जागीच ठार झाले तर मोनिका जीवन राठोड वय ३२वर्षे रा किनवट, भूमिका रामराव राठोड वय १८ वर्षे, प्रियंका देवराव पवार वय ३० वर्षे रा किनवट, हिताशी जीवन राठोड वय २वर्षे रा किनवट तर इर्टीगा चालक संतोष भगवान कदम वय ३९ वर्षे, रा करंजी, ता माहुर जि नांदेड हे पाच जण जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच नांदुरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विलास पाटील, पोहेकों काशीनाथ जाधव, वाहतूक शाखेचे वाघमारे यांच्यासह १०८ रुग्णविहिकेचे डॉ शेख, चालक गणेश वनारे यांनी घटनास्थळी तातडीने धाव घेत अपघातातील जखमींना मदत करीत अधिक उपचारासाठी खामगाव येथील शासकीय रुग्णालयात हलविले अपघातानंतर विलास निवोळकर, गणेश वनारे १०८ रुग्ण वाहीका आश्विन फेरण कृष्णा वसोकार विष्णू धांडे नांदुरा पोलीस स्टेशनचे काशिनाथ जाधव आकाश राठोड वाघमारे, संयुके तसेच ओम साई फाउंडेशनच्या रेस्क्यू टीमला दोन तासाच्या प्रयत्नांनंतर मृतदेह कारमधुन बाहेर काढण्यात यश आले. याप्रकरणी आरोपी ट्रक चालकाविरुद्ध नांदुरा पोलीस स्टेशनला भारतीय न्याय संहिता २०२३च्या कलम २८१,१०६ (१),१२५ (अ), (व)३ २४(४), ३२५(५) यांच्यासह मोटर वाहन अधिनियमाच्या १८४,१३४/१७७,१२२/१७७ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून या अपघात प्रकरणाचा पुढील तपास पोहेकों उमेश भारसाखळे हे करीत आहेत.

### मुदखेड अभिवक्ता संघटनेचे तालुकाध्यक्ष ॲड.माणिक पचलिंग यांचे निधन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड अभिवक्ता संघटनेचे तालुकाध्यक्ष ॲड.माणिक रामराव पचलिंग यांचे ह्रदयविकाराच्या तीव्र झटक्याने दि.१४ रोज बुधवारी मध्यरात्री २ वाजता च्या सुमारास निधन झाले त्यांचे मृत्यू समयी वय ४१ वर्ष होते त्यांच्या पश्चात आई वडील, भाऊ, पत्नी, एक मुलगा एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर आज दि.१४ रोज बुधवारी दुपारी ३ वाजता मुदखेड बारड रोडवरील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या अंत्ययात्रेला मुदखेड न्यायालयाचे न्यायाधीश, जिल्ह्यातील वकील मित्र, राजकीय पक्षाचे नेते, गावातील नागरिक, समज बांधव तसेच मित्र मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युद्धविरामाची घोषणा आधी ट्रम्प यांनी का केली? कॉंग्रेसचा पंतप्रधान मोदींना प्रश्न

**■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतरच्या युद्धविरामाबाबत बुधवारी कॉंग्रेसची एक मोठी बैठक झाली. यानंतर, पत्रकार परिषदेत कॉंग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, ''गेल्या २० दिवसांत कॉंग्रेसची ही तिसरी मोठी बैठक आहे. यामध्ये कॉंग्रेस कार्यकारिणी सदस्यांनीही सहभाग घेतला आहे.

२२ एप्रिलपासून कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी वारंवार ऐक्य आणि एकतेबद्दल बोलत आहेत. त्यांनी सरकारला पूर्ण पाठिंबा दिला आणि ऑपरेशन सिंदूरचे स्वागत केले. राहुल गांधी आणि पक्षाध्यक्ष म्हणाले की, आम्ही सरकार आणि सशस्त्र दलांच्या पाठीशी उभे आहोत. आम्ही दहशतवाद आणि पाकिस्तानविरुद्ध केल्या जाणाऱ्या कारवाईला पाठिंबा देत आहोत. आमच्या दोन सर्वपक्षीय बैठका झाल्या. दोन्ही बैठकांना पंतप्रधान मोदी उपस्थित नव्हते. ही सर्वपक्षीय बैठक औपचारिकतेसाठी आयोजित करण्यात आली होती. राहुल गांधी आणि खरगे यांनी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी पंतप्रधानांना पत्र लिहिले आहे. युद्धविरामाची पहिली घोषणा ट्रम्प यांनी का केली? पंतप्रधान मोदी यावर काहीही बोलत नाहीत.''



कॉंग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश पुढे म्हणाले की, ''अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो म्हणतात की, चर्चा तिसऱ्या ठिकाणी व्हायला हवी. पंतप्रधानही यावर काहीही बोलत नाहीत. आपले परराष्ट्र मंत्री जगाच्या विविध मुद्द्यांवर बोलत राहतात, प्रवचने देत राहतात, पण त्याबद्दल काहीही बोलत नाहीत. विरोधकांना विश्वासात का घेतले जात नाही? राहुल गांधी आणि पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे नेहमी ऐक्याबद्दल बोलतात.''

**कॉंग्रेस 'जय हिंद' सभा आयोजित करणार!**

जयराम रमेश म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर ही कोणत्याही एका पक्षाची मक्तेदारी नाही. पण आता त्याचे राजकारण केले जात आहे. याचे श्रेय घेण्यासाठी राजकारण सुरू आहे. आम्ही देशातील सुमारे एक डझन शहरांमध्ये 'जय हिंद' सभा आयोजित करू आणि जनतेच्या वतीने सरकारला प्रश्न विचारू. या संदर्भात राहुल गांधी शुक्रवारी दिल्लीत पत्रकार परिषद घेणार आहेत.

# 'सीसीटीव्ही लावा, कर्मचाऱ्यांची अल्कोहल टेस्ट तसेच विशेष सत्रांचे आयोजन करा'

## राज्य सरकारची शाळांसाठी नवी नियमावली

**■ मुंबई : वृत्तसंस्था**

महाराष्ट्र सरकारने लहान मुलांचं लैंगिक शोषण थांबवण्यासाठी राज्यातील शाळांसाठी नवी नियमावली जाहीर केली. त्यानुसार, राज्यातील प्रत्येक शाळांत सीसीटीव्ही कॅमेरा बसवणे अनिवार्य असेल. याशिवाय, मुलांसाठी सत्रांचे आयोजन करणे, शालेय कर्मचाऱ्यांची तपासणी करणे बंधनकारक करण्यात आली. नियमांचे पालन न केल्यास सरकारी अनुदान रोखणे किंवा शाळेची मान्यता रद्द करणे यासारखी कारवाई केली जाऊ शकते. ठाणे जिल्ह्यातील बदलापूरमधील एका नामांकीत शाळेतील दोन चिमुकलींवर अत्याचार करण्यात झाला. या पार्श्वभूमीवर शाळांमधील सुरक्षा वाढवण्यासाठी हे नवीन नियम बनवण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने १३ मे २०२५ रोजी एक जीआर जारी केला. त्यानुसार, १८ वर्षांखालील प्रत्येक व्यक्तीला अल्पवयीन मानले जाईल.



### अशी आहे नवी नियमावली

- सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे अनिवार्य आहे, कॅमेऱ्यांचे फुटेज किमान एक महिना जपून ठेवणे बंधनकारक.
- शक्य असल्यास पूर्व प्राथमिक ते इयत्ता सहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी महिला शिक्षकांची नियुक्ती करा.
- शालेय कर्मचाऱ्यांची कसून तपासणी करा, आवश्यक असल्यास चारित्र्य प्रमाणपत्र घ्या.
- बसचालकासह इतर कर्मचाऱ्यांची नियमितपणे अल्कोहल चाचणी करणे आवश्यक आहे.
- प्रत्येक स्कूल बसमध्ये एक महिला कर्मचारी असणे अनिवार्य आहे
- शाळेच्या आवारात १०९८ हा चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक भागात लावावा.
- मुले शाळेत गैरहजर असतील, तर मेसेजद्वारे त्यांच्या पालकांना सूचना द्यावी.
- मानसिक दबावाखाली असलेल्या किंवा त्रासलेल्या विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सत्रांचे आयोजन करावे.
- लहान मुलांना 'गुड टच' आणि 'बॅड टच' बद्दल माहिती द्यावी.

# जिम्नॅस्टिकमध्ये महाराष्ट्राला १२ पदके

## ५ सुवर्ण, ५ रौप्य आणि २ कांस्य पदकांची लयलूट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या युवा खेळाडूंनी दमदार कामगिरी करीत ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेतील जिम्नॅस्टिक प्रकारात पाच सुवर्णपदकांसह बारा पदकांची लयलूट करीत मंगळवारचा दिवस गाजविला. नवी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत रिदमिक जिम्नॅस्टिकमध्ये ओव्हर ऑल प्रकारात मुंबईची परिनाने मदनपोत्रा हिने ८३.६५० गुणांसह सुवर्ण जिंकले, तर मुंबईच्याच शुभश्री मोरे हिने ८०.२०० गुण घेत रौप्यपदक मिळवले. दिल्लीच्या राचेल दीपच्या वाट्याला कांस्यपदक आले.

हूप प्रकारातही परिना हिनेच बाजी मारली. तिने दिल्लीच्या राचेलदीप (१९.३००) हिला मागे टाकून २१.०५० गुण मिळवले. महाराष्ट्राची देवांगी पवार (१८.७२५) कांस्यपदकाची मानकरी ठरली. बॉल प्रकारात आपली सहकारी परिनाला मागे टाकून किमया कार्ले हिने २०.५०० गुणांसह सुवर्ण आपल्या नावे केले. परिनाने २०.१५० गुण मिळवले. दिल्लीच्या राचेलने कांस्य मिळवले.क्लब प्रकारात मुंबईची शुभश्री मोरे अव्वल ठरली. तिने २०.६०० गुण घेत परिनाला मागे टाकले. परिनाने १९.७५० गुणांची कमाई केली. हरियाणाच्या मिष्काने १९.५०० गुणांसह कांस्यपदक मिळवले. रिबन प्रकारात बाजी मारत परिनाने स्पर्धेतील तिसर्या सुवर्ण पदकावर शिक्कामोर्तब केले. रिबनमध्ये तिने २०.६५० गुण, तर रौप्यविजेत्या शुभश्री मोरेने १९.८५० गुण घेतले.

रिदमिक जिम्नॅस्टिकमध्ये महाराष्ट्राच्या मुलींनी सुवर्णपदकांची लयलूट केली असतानाच आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक प्रकारामध्ये मात्र सुवर्णपदक हुकले. मुंबईच्या अनुष्का पाटीलने ४२.०६७ गुण घेत रौप्यपदक मिळवले. तेलंगणाच्या निशिका अगरवाल हिने ४४.३३३ गुण घेत सुवर्णपदक पटकावले, तर ४१.२३३ गुण मिळवणारी ठाण्याची सारा राऊळ कांस्यपदकाची मानकरी ठरली.




### परिनाची सुवर्ण हॅटट्रिक

रिदमिक जिम्नॅस्टिक प्रकारात परिना मदनपोत्रा हिने लक्षवेधी कामगिरी करताना ३ सुवर्णपदके जिंकली. तिने रिबन, बॉल यासह ओव्हर ऑल प्रकारात सुवर्ण जिंकले. मागील वर्षी संयुक्ता काळे या खेळाडूने ५ सुवर्ण जिंकून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.




## बेटींगचा नवा विळखा

पैज लावण्याचा निरागस प्रकार आज जुगार म्हणून नावारुपाला आला आहे आणि त्याची व्याप्ती वाढत आहे. बेटिंग हे नाव या जुगाराने धारण केले आहे. यात लाखो-करोडोंची उलाढाल होत असून, सामान्य माणसे, तरुण मुले यात फसत आहेत, फसवले जात आहेत. ऑनलाईन ॲपचा यातील वाटा वाढत आहे. पैज लावणे आपल्यासाठी काही नवीन नाही. एखादा म्हणतो, आज अमुक शिक्षक येणार नाहीत. आपण विचारतो, कशावरून? समोरचा उत्तरतो, मी सांगतो म्हणून, चल, लावतो पैज?' हे असे संवाद आपल्या लहानपणी अनेकदा झडलेले आहेत. काही खेळ पैज लावून खेळले जायचे. साहित्याचा विचार केला तर खुद्द ज्ञानेश्वर माउलींनीही ज्ञानेश्वरीत आपल्या मायमराठीचे कवतिक करताना 'अमृतातेही पैजा जिंके' अशी लोभस शब्दयोजना केली आहे. खेळीमेळीच्या वातावरणात लावली जाणारी पैज बघता बघता नागिणीसारखा फूत्कार कधी सोडू लागली ते कळलेच नाही. पैजेचे रुपांतर पैसे लावून खेळल्या जाणाऱ्या जुगारात झाले. या नागिणीने अनेकांना कंगाल केले, देशोधडीला लावले, कुटुंबे उद्ध्वस्त केली. हे कमी म्हणून की काय, अलीकडे आधीच मोबाईलचे व्यसन लागलेले अनेकजण जाहिरातींमधून दाखवल्या जाणाऱ्या बेटिंग ॲपच्या जाळ्यात फसत आहेत. हे सर्व का घडत आहे याचा विचार केला तर एक गोष्ट लक्षात येईल, ती म्हणजे सतत केला जाणारा जाहिरातींचा मारा, आणि या माऱ्याद्वारे दाखवली जाणारी अविश्वसनीय प्रलोभने. हे सर्वसाधारणपणे कधी आढळते याचा आढावा घेतला तर समजेल की क्रिकेटचा हंगाम सुरु व्हायच्या आधीपासून; आणि आपण एखादे ॲप डाउनलोड केले असेल, तर त्याच्या माध्यमातून किंवा आपण मोबाईल गेम खेळताना वारंवार दिसणाऱ्या जाहिरातींमधून. हे कमी म्हणून की काय, एसएमएसचाही मारा चालू होतो आणि त्यातून 'तुमच्या खात्यात अमुक इतकी नाणी बोनस म्हणून जमा झाली आहेत. ती वापरून हा गेम खेळा' अशा अर्थाचे संदेश येतात. पैज लावणे हा प्रकार प्रत्यक्षात दोघा-तिघांमध्ये घडतो; तर बेटिंगमध्ये अनेकजण सहभागी होत असतात. ही वेगवेगळी ॲप्स डाउनलोड करायला सांगणाऱ्या कंपन्या कुठल्या आहेत, त्या कितपत विश्वासार्ह आहेत, असे अनेक मुद्दे आहेत. क्रिकेटचे उदाहरण घेतले, तर अमुक सामन्यात अमुक फलंदाज शतक ठोकेल का, कोणता फलंदाज सर्वात जलद अर्धशतक पुरे करेल, कोणता गोलंदाज सर्वात जास्त बळी घेईल, कोण सर्वात जास्त झेल पकडेल, किती चौकर किंवा षटकार ठोकले जातील, अशा विविध प्रश्नांवर पैसे लावले जातात. जिंकणाऱ्याला जी रक्कम मिळते त्यासाठी काही अटीही असू शकतात. हरणाऱ्याचे पैसे बुडतात. अर्थात फायदा कमावणे हा एकमेव उद्देश असल्याने कोणी हरो वा कोणी जिंको, ॲप बनवणाऱ्या कंपनीला बक्कळ फायदा होतो. जिंकणारा लोभापायी अधिक रक्कम लावायला लागतो, तर हरणारा झालेले नुकसान भरून काढण्यासाठी खेळत राहतो. शिवाय या सर्वांना इरेस पेटविण्यासाठी अनेक नामांकित, तारांकित खेळाडू, चित्रपट तारका-तारे, मनोरंजन क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती हजर असतातच.

# धक धक गर्ल माधुरीचा वाढदिवस

हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार अभिनेत्री, लाखो दिलांची धडकन, धक धक गर्ल माधुरी दिक्षितचा आज ५८ वा वाढदिवस. माधुरी दीक्षित म्हणजे हिंदी चित्रपट सृष्टीला पडलेले एक मधुर स्वप्न. आज जे ४० ते ६० या वयोगटात आहे त्यांच्यासाठी माधुरी म्हणजे सर्वस्व होते. माधुरीला पाहतच हे लोक लहानाचे मोठे झाले. माधुरीचा चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो पाहणाऱ्यांची संख्या त्या काळात लाखोंच्या घरात होती.

१५ मे १९६७ रोजी जन्मलेली माधुरी म्हणजे सुंदरता, नृत्य आणि अभिनय यांचा त्रिवेणी संगम. वयाच्या १७ व्या वर्षी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश करणाऱ्या माधुरीचा पहिलाच चित्रपट अबोध आपटला त्यामुळे तिच्या पदार्पणाची दखल कोणी घेतली नाही. त्यानंतर तिने काही बी ग्रेड चित्रपटातही भूमिका केल्या. उत्तर दक्षिण हा तिचा तसा पहिला व्यावसायिक चित्रपट मात्र यातीलही तिच्या भूमिकेची कोणी दखल घेतली नाही मात्र तेजाब चित्रपट आला आणि तिचे नशीबच बदलले. तेजाब चित्रपटातील एक दो तीन... हे गाणे जबरदस्त हिट झाले. या गाण्यातील तिच्या नृत्याने तरुणांना वेड लावले. या चित्रपटातील तिने साकारलेली मोहिनी नावाची भूमिका प्रेक्षक आजही विसरू शकले नाहीत. माधुरीने हा चित्रपट आपल्या अभिनय आणि नृत्याने यशस्वी करून दाखवला. या चित्रपटानंतर निर्माते दिग्दर्शक तिच्या घरी रांगा लावू लागले. सलग आठ चित्रपट फ्लॉप झालेल्या माधुरीची तेजाबच्या यशानंतर यशस्वी अभिनेत्रींमध्ये गणना होऊ लागली. या चित्रपटात तिचा नायक अनिल कपूर हा होता. ही जोडी प्रेक्षकांना खूप आवडली. पुढे या जोडीने परींदा, रामलखन, किशन कन्हैया, जीवन एक संघर्ष, जमाई राजा, खेल, बेटा, जिंदगी एक जुआ, राजकुमार, पुकार असे अनेक हिट चित्रपट दिले. माधुरीची जोडी केवळ अनिल कपूरशीच जमली असे नाही तर जॅकी श्रॉफ, मिथुन चक्रवर्ती, ऋषी कपूर, संजयदत्त, शाहरुख खान, अमीर खान, सलमान खान अशा सर्वच अभिनेत्यांशी जमली. तिने अभिनय केलेले जवळपास सर्वच चित्रपट यशस्वी झाले. तेजाब, दिल, साजन, परींदा, राम लखन, खलनायक, हम आप के है कौन, प्रेमग्रंथ, मृत्युदंड, बडे मिया छोटे मिया, बेटा, कोयला, दिल तो पागल है, देवदास हे चित्रपट तिकीट बारीवर तुफान यशस्वी ठरले. तिचे अनेक चित्रपट हिट तर काही सुपरहिट झाले. तिच्या हम आपके है कौन या चित्रपटाने तर इतिहास घडवला. या चित्रपटातील तिच्या अभिनयाने आणि सौंदर्याने अनेकांना घायाळ केले. या चित्रपटातील तिची भूमिका पाहून प्रसिद्ध चित्रकार एम एफ हुसेन हे तिच्यावर इतके फिदा झाले की त्यांनी तिचे शेकडो पोट्रेट बनवले यावरून लोक त्यांना माधुरी फिदा हुसेन असे म्हणू लागले. त्यांनी तिच्यावर गजगामीनी नावाचा चित्रपटही बनवला. माधुरीच्या नावाचे गाणेही आले ( माधुरी मिली मुझे रस्ते मे...) इतकेच काय तर तिच्या नावाने चित्रपट देखील आला ( मै माधुरी दीक्षित बनना चाहती हु) तिला अनेक पुरस्कार मिळाले. प्रतिष्ठेचा फिल्मफेअर पुरस्कार तिने तब्बल पाच वेळा मिळवला. दिल, बेटा, हम आप के है कौन, दिल तो पागल है, देवदास या चित्रपटातील तीच्या भूमिकेसाठी तिला फिल्मफेअरने सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार दिला. तिने राष्ट्रीय पुरस्कारही मिळवला. भारत सरकारने तिला पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले आहे. माधुरीने जवळपास ७० हुन अधिक चित्रपटात भुमीका केल्या. यातील तिच्या भूमिका आजही लोकप्रिय आहेत. लोकप्रेयतेच्या शिखरावर असतानाच तिने श्रीराम नेणे या अमेरिकास्थित उद्योगपतीशी लग्न केले. लग्नाआधी तिचे संजय दत्तशी अफेअर आहे ते दोघे लग्न करणार असे फिल्मी मासिकात छापून येत होते तिने मात्र या सर्व अफवा असल्याचे सिद्ध केले आणि लग्नानंतर थेट अमेरिका गाठली. अमेरिकेत काही वर्षे राहिल्यावर ती पुन्हा मुंबईत परतली. मुंबईत परतल्यावर तिने गुलाब गॅंग आणि देढ इष्कीया या चित्रपटाद्वे पुनरागमन केले. त्यानंतर तिने टेलिव्हिजनवर झलक दीखला जा, डान्स इंडिया डान्स यासारख्या नृत्यावर आधारित रिऍलिटी शो चे जज म्हणूनही काम केले. आज इतक्या वर्षानंतरही माधुरीची जादू कायम आहे. गेल्या दोन दशकात शेकडो अभिनेत्री हिंदी चित्रपट सृष्टीत आल्या आणि गेल्या पण तिची बरोबरी करणारे तर सोडाच पण तिच्या जवळपास पोहचेल अशी एकही अभिनेत्री हिंदी चित्रपट सृष्टीला मिळाली नाही यातूनच माधुरीचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. सौंदर्य, नृत्य आणि अभिनय यांचा त्रिवेणी संगम असलेल्या सदाबहार अभिनेत्री माधुरी दिक्षितला वाढदिवसाच्या



खूप खूप शुभेच्छा......!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# मुंबईकरांचा प्रवास होणार अधिक सुखकर
# दहिसर ते काशिगाव मेट्रो चाचणीला सुरुवात

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१४, मुंबई :** मुंबईतील उपनगरीय प्रवाशांकरिता आनंदाची बातमी असून समस्त उपनगरीय मुंबईकरांचा प्रवास सोपा आणी सुखकर करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक१४ मे पासून मेट्रो-९ च्या चार स्थानकांमध्ये मेट्रोची चाचणी सुरू करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. ही चाचणी दहिसर (पूर्व) ते काशी व्हिलेज स्टेशन या ४.९७३ किमी मार्गावर होईल. दहिसर (पूर्व) आणि मीरा भाईंदर दरम्यानच्या १३.५ किमी मार्गावर मेट्रो ९ चे बांधकाम सुरू आहे. संपूर्ण मार्गाचे बांधकाम पूर्ण न झाल्यामुळे, ही सेवा दोन टप्प्यात सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले.





मुंबई मेट्रो-९ कॉरिडॉरच्या संपूर्ण मार्गाचे ८५% पेक्षा जास्त बांधकाम पूर्ण झाले आहे. या मार्गावर एकूण ८ स्थानके आहेत. चार मेट्रो स्थानके चाचणीसाठी तयार आहेत, तर उर्वरित चार मेट्रो स्थानके देखील पुढील काही आठवड्यात चाचणीसाठी तयार होतील.

इतर चार स्थानके तयार होताच, संपूर्ण मेट्रो मार्गावर चाचणी धावा सुरू केल्या जातील. २०२५ च्या अखेरीस या मार्गावर मेट्रो सेवा सुरू करण्याची एमएमआरडीएची योजना आहे. मेट्रो-९ कॉरिडॉर देखील मेट्रो-७अ शी जोडलेला आहे.

हे मेट्रो ९ रेड लाईनचा भाग आहे. दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व पर्यंत जाणाऱ्या लाईन ७ पासून सुरू होते. पहिल्या टप्प्यात, मेट्रो अंधेरी (वेस्टर्न एक्सप्रेस हायवे) ते काश्मिरीपुरा यांना जोडला जाणार आहे.

दुसऱ्या टप्प्यात भाईंदर (पश्चिम) येथील सुभाषचंद्र बोस स्टेडियमपर्यंत वाढवली जाईल. हा मार्ग दहिसरहून मीरा-भाईंदरलाही जातो. मेट्रो लाईन ९ ची एकूण लांबी १३.५८१ किमी आहे. त्यात उंच (११.३८६ किमी) आणि भूमिगत (२.१९५ किमी) ट्रॅक दोन्ही आहेत. पूर्ण बांधणी झाल्यावर त्यात १० स्थानके असतील.

पहिल्या टप्प्यात चार स्थानके प्रवाशांसाठी खुले होणार आहेत. दहिसर, पांडुरंग वाडी, मिरागाव आणि काशीगाव हे आहेत. उर्वरित स्थानके नंतर सुरु होणार असून यामध्ये सुभाष चंद्र बोस स्टेडियम, शहीद भगतसिंग गार्डन, मेदितिया नगर आणि साई बाबा नगर यांचा समावेश आहे. गेल्या आठवड्यात, एमएमआरडीएने जनतेला दहिसर आणि काशीगाव दरम्यानच्या कॉरिडॉरपासून दूर राहण्याचा इशारा दिला होता. हे २५,००० व्होल्टच्या ओव्हरहेड वायरमुळे झाले.

मेट्रो-९ कॉरिडॉरचे बांधकाम अद्याप सुरू झालेले नाही. कॉरिडॉरच्या बांधकामासाठी पुढील दोन ते अडीच वर्षे लागतील. अशा परिस्थितीत, एमएमआरडीएने मेट्रो-९ शी जोडलेल्या मेट्रो-७ कॉरिडॉरच्या चारकोप डेपोमधून मेट्रो-९ चे डबे देखभालीसाठी एक योजना तयार केली आहे.

**मेट्रो ९ स्थानके पुढील प्रमाणे आहेत. (फेज १)**

- ✻ दहिसर (पूर्व)
- ✻ पांडुरंग वाडी
- ✻ मिरगाव
- ✻ काशी गाव

**दुसरा टप्प्यात पुढील स्टेशन असतील**

- ✻ साई बाबा नगर
- ✻ मेडितिया नगर
- ✻ शहीद भगतसिंग गार्डन
- ✻ सुभाषचंद्र बोस स्टेडियम

## का तळा ..

आटलेल्या निर्झरारे
कसे फोडी कातळां
ओल धरते थेंब थेंब
जल लपते का तळा

शोध घे हरितत्वाची
जळून गेलायं मळा
सुकून गेले शब्दपण
गळाकाढे कसे गळा

धरणे स्वतः अडली
पाणीजप जराबाळा
तहानयंदा अतितीव्र
अजून दूर पावसाळा

तप्त हवा चिडलेली
सूर्य ओकला झळा

अंत पाहे जीवनाचा
कोरडा करे निर्जळा

भयभीत ती सावली
पत्थरा शीरआफळा
टॅंकर येताचं एखादा
धावाधावा पळापळा

येणारं कधी मान्सून
प्रतिक्षा करे उन्हाळा
हाल पाहवेना त्याला
कसाअसा जिव्हाळा

टाहो फोडतो निसर्ग
पर्यावरणालेसांभाळा
दोष का देई दुष्काळा
स्वताचं कोरलाभाळा

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**मो. ९७३०३०६९९६**

## के.रामलू शाळेचा दहावीचा निकाल १०० टक्के
## संकेत अष्टमवार इंग्रजी माध्यमातून तालुक्यातून प्रथम

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१३, कुंडलवाडी (नांदेड) :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी के.रामलू पब्लिक स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे .तर संकेत साईनाथ अष्टमवार हा ९७.२०टक्के गुण घेऊन इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून तालुक्यात प्रथम आला आहे आणि दिडशेरे तुळशीराम चक्रधर हा ९६.०० टक्के गुण घेऊन केंद्रातून द्वितीय तसेच शेख आयन अलीम हा ९४.६० टक्के गुण घेऊन केंद्रातून तृतीय आला आहे .

दहावीच्या बोर्ड परीक्षेला शाळेतील एकूण ५९ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ९०% पेक्षा जास्त गुण घेणारे १६ विद्यार्थी, ८५% पेक्षा जास्त गुण घेणारे १९ विद्यार्थी , ८० टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे १८ विद्यार्थी , तर प्रथम श्रेणीत ०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत . शाळेने यशाची परंपरा कायम राखून ठेवल्याने गावकऱ्यांच्या व पालकांच्या वतीने



त्यांचे कौतुक करत आहेत . तसेच विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्कूरवार, सचिव यशवंत संगमवार संचालिका रमा ठक्कूरवार आणि मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## वाघुले अकार्यक्षम व शिंदे गट धार्जिणे
## असल्याने लेलेंना पुन्हा आणले : रोहिदास मुंडे

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. १४ दिवा (ठाणे) :** भाजपने ठाणे जिल्हा अध्यक्ष पदावरून संजय वाघुले यांना हटवून संदीप लेले यांना पुन्हा अध्यक्षपदी विराजमान केल्याने एकप्रकारे वाघुले यांच्या अकार्यक्षम कार्यपद्धतीवर पक्षाने शिक्कामोर्तब केला असावा असा सणसणीत टोला ठाकरेंचे शिवसेनेचे दिवा शहर संघटन रोहिदास मुंडे यांनी लगावला आहे.

भाजप पक्ष ठाण्यात संपवण्याचे काम वाघुले यांनी अध्यक्ष पदाची सूत्र हाती घेतल्यानंतर केल्याचा आरोप रोहिदास मुंडे यांनी भाजप पक्ष सोडल्या नंतर केला होता. पक्षातील कार्यक्षम नेतुत्व बाजूला करून शिंदे गटाच्या तालावर वाघुले चालत असल्याचा आरोपही त्यावेळी रोहिदास मुंडे यांनी केला होता. आता वाघुले यांना पक्षानी बाजूला केल्याने रोहिदास मुंडे यांनी वाघुले यांच्यावर निशाना साधला आहे.



याबाबत बोलताना मुंडे यांनी सांगितले कि, संजय वाघुले यांची भूमिका हि पक्ष संघटना वाढवण्या ऐवजी भाजप ठाण्यामध्ये कमकुवत करण्याची राहिल्याचा अनुभव आपल्याला त्यावेळी आला. पक्षाने त्यांना आता घरचा रस्ता दाखवला असून भाजपच्या नेतृत्वाला लवकर जाग आली असा टोला हि त्यांनी लगावला आहे

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## दहावीच्या परीक्षेत महात्मा गांधी विद्यालयाची यशाची परंपरा कायम

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१३, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड येथील महात्मा गांधी विद्यालयाने माध्यमिक शालांत परीक्षा २०२५ च्या निकालात दरवर्षा प्रमाणे याही वर्षी यशाची परंपरा कायम ठेवली आहे. काल दिनांक १३ रोजी राज्य शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल दूपारी १ वा.बोर्डाच्या संकेत स्थळावरुन घोषीत केला.त्यात मुदखेड शहरातील सर्वात जुनी व मोठी शाळा म्हणुन गणली जाते त्या महात्मा गांधी विद्यालयाने दरवर्षा प्रमाणे याही वर्षी निकाल ९०.६५ टक्के लागला असून, यशाची परंपरा कायम ठेवत अनेक विद्यार्थी यशस्वी केले आहे.या वर्षी २१५ विद्यार्थी परीक्षेस बसले होते,विशेष म्हणजे शाळेतून एकूण ५ विद्यार्थी ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेवून यश संपादन केले,त्या पैकी ४० विद्यार्थी विशेष प्राविण्य,६४ विद्यार्थी प्रथमश्रेणी तर ६७ द्वितीयश्रेणीत व २३ तृतीयश्रेणीत असे एकूण १९४ विद्यार्थी उत्तीर्ण आहेत. त्यात कु.श्रावणी अंजनवाड ९६.८० गूण घेवुन शाळेत प्रथम,द्वितीय -श्रुती पचलिंग ९२.००,तृतीय-शिवपूजा गाढे ९१.८०,पायल मादिलवाड ९०.८० व अजिंक्य बाशिंगे ९०.४० गुण घेवून मान मिळवला आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थांचे व दहाविला शिकविणार्या सर्व शिक्षकांनी प्रदीप बाविस्कर ,यशवंत कांबळे, संजय राजे,माधव कुलकर्णी,राम गायकवाड,प्रभाकर नागरगोजे,कालीदास कोंपले,बालाजी बुन्नावार,प्रकाश देशमुख व इतर शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले.

## महाराष्ट्राचा महिला बास्केटबॉल संघ उपांत्य फेरीत यजमान बिहार संघाचा १०३ गुणांनी धुव्वा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, पाटना :** महाराष्ट्र महिला बास्केटबॉल संघाने सलग दोन सामने जिंकून ७ व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत उपांत्य फेरीतील धडक मारली आहे.

पाटीलपुत्र क्रीडा संकुलात सुरू असलेल्या बास्केटबॉल स्पर्धेत पहिल्या सामन्यात महाराष्ट्र संघाने केरळ संघाचा ७२-५९ गुणांनी पराभव केला. महाराष्ट्र संघाकडून त्विशा शर्मा २५ गुण, रेवा कुलकर्णी १२ गुण, वैष्णवी परदेशी ११ गुण, आर्या फटांगरे ९ गुण, रिशिता कुलकर्णी ७ गुण, हर्षला पाटील ६ गुण यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. मध्यंतराला महाराष्ट्राचा संघ ३३ विरुद्ध ३० अशा तीन गुणांनी पिछाडीवर होता. उत्तरार्धात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपला खेळ उंचावत संघाला १३ गुणांनी विजेतेपद प्राप्त करून दिले. दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्र संघाने यजमान बिहार संघाचा १०३ गुणांनी धुव्वा उडवत ११८ विरुद्ध १५ असा विजय मिळवला. महाराष्ट्र संघाकडून तनवी जाधव १९ गुण, रेवा कुलकर्णी १८ गुण, साईशा भगत १८ गुण, वेदिका सिंग १७ गुण यांनी मोलाची कामगिरी बजावली. उद्या महाराष्ट्राचा संघ पंजाब विरुद्ध आपल्या गटातील अंतिम सामना खेळेल. प्रशिक्षिका मुद्रा अग्रवाल तसेच सहप्रशिक्षक शिवछत्रपती पुरस्कार विजेते शत्रुघ्न गोखले यांचे संघाला मार्गदर्शन मिळत आहे. गत तामिळनाडू स्पर्धेत महाराष्ट्राने कांस्य पदक जिंकले होते.

## पालशेत विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० टक्के कु.शौर्या असगोलकर प्रथम क्रमांकाची मानकरी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१३, गुहागर (पालशेत) :** मंगळवार दिनांक १३ मे २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इ. १० वीच्या परीक्षेचा निकाल जाहीर असून यंदा राज्याचा निकाल ९४.१०% लागला आहे. यावर्षीच्या निकालात पुन्हा कोकण विभागाने बाजी मारली असून कोकण विभागाचा निकाल ९८.८२% लागला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील पालशेत येथील रयत रयत शिक्षण संस्थेचे ''श्रीमती रखुमाई पांडुरंग पालशेतकर (पालशेत) विद्यालयाचा एस,एस,सी परीक्षा मार्च-२०२५ चा निकाल १००% लागला असून एकूण १०५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यात कु.शौर्या संजीवन असगोलकर -९५.८०( प्रथम क्रमांक), कु.मंथन विनोद आग्रे- ९०.८० ( द्वितीय क्रमांक), कु.विराज संदिप गावणंग- ९० %,(तृतीय क्रमांक), कु.स्वरा मनोहर जोशी-९०%,( तृतीय क्रमांक) या विद्यार्थ्यांनी सदर परीक्षेत क्रमांकाने उत्तीर्ण होत घवघवीत यश संपादन केले.

## राजेंद्र विद्यालयाचा एस.एस.सी. निकाल ९२.४३ टक्के

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१३, खंडाळा (सातारा) :** खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा अंतर्गत राजेंद्र विद्यालय खंडाळा एस.एस.सी.परीक्षेच्या उज्वल निकालाची परंपरा याही वर्षी कायम राहिली असून विद्यालयाचा एकूण शेकडा निकाल ९२.४३ लागला असून इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी २३८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी विशेष प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी संख्या ५९,प्रथम श्रेणी मिळवलेली विद्यार्थी संख्या ८७,द्वितीय श्रेणी मिळालेले विद्यार्थी संख्या६५,तृतीय श्रेणी मिळालेले विद्यार्थी संख्या ९ अशी असून विद्यालयाने या ही वर्षी उज्वल यश संपादन केले आहे. खंडाळा विभाग शिक्षण समितीच्या पंचक्रोशी विद्यालय जवळे लोहम फाटा विद्यालयाचा आणि न्यू इंग्लिश स्कुल कामथी या दोन विद्यालयांचे एस.एस सी. बोर्ड २०२५ परीक्षेत १०० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.तर तालुक्यातील संस्थेच्या इतर सर्व शाळांमधून एस.एस.सी. २०२५ बोर्ड परीक्षेसाठी बसलेल्या एकूण ७४५ विद्यार्थ्यांपैकी ७१० विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने संस्थेचा एकूण शेकडा निकाल ९५.३० टक्के इतका लागलेला आहे. राजेंद्र विद्यालयातील माध्यमिक विभागातील चि.गाढवे हर्षद गणेश (९६.००%)-(प्रथम क्रमांक),कु. धुमाळ सिद्धी महेंद्र(९६.००%)-(प्रथम क्रमांक),कु.ढमाळ प्रेरणा प्रवीण (९४.४%)-(द्वितीय क्रमांक), चि.लंगडे अमेय प्रमोद(९४.४%)-(द्वितीय क्रमांक), चि.गाढवे स्वरूप सचिन (९४.४%)-(द्वितीय क्रमांक) चि.राऊत विनय संदीप(९३.२%)-(तृतीय क्रमांक)मिळविला.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा संस्थेचे अध्यक्ष शंकररावजी गाढवे सर, उपाध्यक्ष सुरेश पवार,सचिव अनिरुद्ध दादा गाढवे,संस्थेचे संचालक सर्व पदाधिकारी,विद्यालयाचे प्राचार्य शब्बीर नालबंद,उपप्राचार्या अरुंधती गाढवे,उपमुख्याध्यापिका सुशीला मोहिते,पर्यवेक्षक.

# अंमली पदार्थ विरोधी पथक परिमंडल ०३ अॅक्शन मोडवर

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१३, कल्याण (ठाणे) :** दि.१२, रोजी कल्याण व डोंबिवली शहर परिसरात बेकायदेशीर अंमली पदार्थ विकी करणारे पेडलर यांचेवर कारवाई करण्या करीता पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ कल्याण यांचे विशेष कारवाई पथकाने व पोलीस ठाणे यांनी परिमंडळात खालील प्रमाणे अंमली पदार्थ विरोधी कारवाई करण्यात आलेली माहिती (१) कोळसेवाडी पोलीस ठाणे हददीत सोनवाणे टॉवर समोर रस्त्या लगतच्या मोकळया मैदानाजवळ कल्याण पुर्व परिसरात १) आरोपी नाव प्रथम तुकाराम गायकवाड, वय. २३ वर्षे रा.प्रथम निवास, जरिमरी मंदीर रोड, मनोज निवासचे बाजुला, तिसगांव कल्याण पु. याचे ताब्यातुन १.०५७ कि.ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आला असुन आरोपीस अटक करण्यात आली. त्याचे विरूध्द कोळसेवाडी पोलीस ठाणे गु.र.नं.३६९/२५, अंमली



पदार्थ विरोधी कायदा १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) (पप) (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले. (२) बाजारपेठ पोलीस ठाणे हददीतुन अमृतपर्ल बिल्डींगचे बाजुला, कोळीवाडा ते बकरामंडी कडे जाणारा रस्ता, कोळीवाडा कल्याण परिसरात १) आरोपी नाव गोपाळ गणपत भिडे, वय - ४५ वर्षे रा. कल्याण कोळीवाडा, रूम नं.१ गोविंदवाडी रोड, कल्याण प. जिल्हा ठाणे याचे ताब्यातुन ३७० ग्रॅम गांजा अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आला असुन आरोपीस अटक करण्यात आली. त्याचे विरूध्द बाजारपेठ पोलीस स्टेशन गु.र.नं.३०५/२५, अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) (खख) (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले.(३) खडकपाडा पोलीस ठाणे हददीतुन बनेली रोड आंबिवली रेल्वे फाटक जवळ १) महिला नामे शहनाज तेजीब हुसेन इराणी, वय ६५ वर्षे रा. इंदीरानगर, वाल्मिकी शाळे समोर, इराणी वस्ती, आंबिवली रेल्वे स्टेशन जवळ, ता. कल्याण जिल्हा ठाणे हिचे ताब्यातुन ४५५ ग्रॅम गांजा अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आला असुन आरोपीस अटक करण्यात आली. तिचे विरूध्द खडकपाडा पोलीस स्टेशन गु.र.नं.३६५/२०२५, अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले.

असे वरील प्रमाणे एकुण ०३ गुन्हे दाखल केले असुन नमुद गुन्हयांत एकुण १.८२५. ५७ कि.ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ जप्त करण्यात येवुन आरोपींना अटक करण्यात आली आहे.सदरची कामगिरी परिमंडळ ३ कल्याण विशेष कारवाई पथक व पोलीस ठाणे यांनी संयुक्तपणे केली आहे.

अशा प्रकारे परिमंडळ ३ कल्याण मध्ये अंमली पदार्थ विरूध्द कारवाई सुरू राहणार असल्याची माहिती देण्यात आले.

# मुदखेड पोलीस ठाण्यात २३ बेवारीस वाहने

## मालकी कागदपत्रे आणून वाहने घेऊन जावे : पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांचे आवाहन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१३, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड पोलीस ठाण्यात गेल्या अनेक दिवसांपासून बेवारस असलेले दुचाकी तसेच टेम्पो असे एकूण २३ वाहन ठाण्याच्या परिसरात ठेवण्यात आले असून ज्यांचे वाहन आहेत त्यांनी कागदपत्रे आणून घेऊन जाण्याचे आव्हान मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी केले आहे.

नांदेड जिल्हा एप्रिल २०२५ अखेर पोलीस स्टेशन मुदखेड अंतर्गत बेवारस रित्या मोटरसायकल तसेच टेम्पो या वाहनांची पोलीस स्टेशनच्या प्रांगणात



वाहने उभे करण्यात आले असून संबंधित मालकांनी वाहनाची ओळख पटवून घेण्यासाठी पोलीस स्टेशन नोटीस बोर्डवर वाहन नंबर लावण्यात आले असून सदर वाहन तीन दिवसाच्या आत घेऊन जाण्यासाठी मुदत देण्यात आली असून या मुद्दतीनंतर बेवारस असलेले सर्व वाहन यांचा जाहीर लिलाव पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक वसंत सप्रे हे करणार असल्याचे एका प्रेस नोट डरे सांगितले आहेत. बेवारस असलेल्या वाहनांमध्ये दुचाकीमध्ये हिरो होंडा स्प्लेंडर, पल्सर, फॅशन प्रो, स्प्लेंडर प्लस, होंडा शाईन, एक्टिवा, बजाज प्लेटिना, टीव्हीएस स्टार सिटी, हिरो शाईन, स्प्लेंडर प्लस, आणि एक चार चाकी वाहनांत टेम्पो असे वाहन मुदखेड पोलीस ठाण्यामध्ये बेवारस असुन ज्यांची आहेत त्यांनी तात्काळ मुदखेड पोलीस ठाण्याला भेट देऊन आपआपल्या गाडीच्या कागदपत्रांसह वाहन दाखल करून घेऊन जावे अन्यथा लिलाव करण्यात येईल असे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी सांगितले.

# लोकप्रतिनिधींशी समन्वय ठेवून मान्सूनपूर्व कामे पूर्ण करा - ठाणे पालिका आयुक्तांचे निर्देश

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१४, ठाणे :** मान्सूनपूर्व तयारीबाबत ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी काही महत्वाचे निर्देश दिले आहेत.

लोकप्रतिनिधींशी समन्वय ठेवून सर्व कामे करा, अशा प्रकारचे सक्त निर्देश मान्सूनपूर्व तयारीबाबत ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

ठाणे महापालिकेच्या कार्यक्षेत्रात मान्सूनपूर्व कामे जलदगतीने सुरू असून ही सर्व कामे येत्या ३० मे पूर्वी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महापालिकेने निश्चित केले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी आज झालेल्या बैठकीत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. त्यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रशासनाचे लक्ष सर्व कामांवर केंद्रित आहे आणि पावसाळ्यात आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास महापालिका यंत्रणा पूर्णपणे सज्ज आहे.

या बैठकीत आयुक्तांनी स्पष्टपणे सांगितले की, सध्या सुरू असलेल्या कामांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा समावेश करून, त्यांच्याशी



समन्वय साधूनच काम पूर्ण करावे. तसेच पावसाळ्याच्या काळात कोणत्याही आपत्कालीन स्थितीत सर्व विभागांनी एकत्रितपणे कार्य करावे आणि एकमेकांवर जबाबदारी न ढकलता नागरिकांच्या हितासाठी तातडीने उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

खासदार नरेश म्हस्के यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत माजी नगरसेवक, महापालिका अधिकारी आणि प्रभाग समित्यांचे सहाय्यक आयुक्त उपस्थित होते. उपायुक्त गजानन गोदेपुरे यांनी मान्सूनपूर्व कामांची माहिती सादर केली. स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांच्या भागातील समस्या मांडल्या, ज्यावर संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले.

गावदेवीसह शहरातील नालेसफाईचे काम युद्धपातळीवर सुरू असून, मध्ये पडलेल्या पावसामुळे डोंगरावरून वाहून आलेल्या गाळामुळे काही ठिकाणी पुन्हा नालेसफाई करावी लागणार आहे. अंतर्गत गटारे आणि रस्त्यांच्या दुतर्फा असलेली गटारे देखील साफ केली जात आहेत. रस्त्यांवरील खड्डे पावसाळ्यात समस्या ठरू नयेत यासाठी विशेष दक्षता घेण्यात आली असून, कोणत्याही रस्त्यावर खड्डा आढळल्यास तो तत्काळ बुजवण्यात येईल.

वृक्षछाटणीबाबत आयुक्तांनी सांगितले की, एप्रिलपासून ही कामे सुरू झाली असून उर्वरित ठिकाणांची छाटणी ३० मेपूर्वी पूर्ण केली जाईल. तसेच छाटणीदरम्यान तयार होणाऱ्या हरित कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

एमएमआरडीए, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम विभाग यांसारख्या इतर प्राधिकरणांकडील कामेही ३० मेपूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पावसाळ्यात त्यांच्या अखत्यारितील रस्त्यांवर खड्डे पडल्यास महापालिका स्वतः पुढाकार घेऊन नागरिकांच्या सोयीसाठी ती कामे पार पाडेल, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

दरम्यान या बैठकीत नालेसफाई, गटारसफाई, वृक्षछाटणी, रस्ते दुरुस्ती, आरोग्यविषयक उपाययोजना आदी मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. उपस्थित लोकप्रतिनिधींनी आयुक्तांच्या सक्रिय भूमिकेचे कौतुक करत त्यांच्या कार्यप्रणालीचे आभार मानले.

# उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडून छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, ठाणे :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आमदार प्रकाश सोळंके, अमरावतीचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेखाताई ठाकरे, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव सचिन कावळे, सहाय्यक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, विजय शिंदे यांच्यासह मंत्रालयातील अधिकारी कर्मचारी यांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.



# नवी मुंबई मनपाच्या २३ शाळांचा दहावीचा निकाल ९४.७२ टक्के

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, नवी मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ या कालावधीमध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता दहावी च्या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळांचा निकाल ९४.७२ टक्के एवढा लागलेला आहे. यामध्ये नमुंमपा शाळा क्रमांक १०४ राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, रबाळे येथील अंशिका अंगद यादव ही विद्यार्थिनी ९५ टक्के गुण संपादन करुन मनपाच्या २३ शाळांमध्ये सर्वाधिक गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी तिचे व सर्वच गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

नवी मुंबई मनपा क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमधून विद्यार्थ्यांनी दहावीची शालांत परीक्षा दिली. या परीक्षेत नमुंमपा माध्यमिक २३ शाळांतील २६९८ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी २५६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून एकूण निकाल ९४.७२ टक्के एवढा लागलेला आहे.





विशेष म्हणजे नमुंमपा संचलित २३ माध्यमिक शाळांमधून नमुंमपा शाळा क्रमांक १०८ दिघा, नमुंमपा शाळा क्र.१११ तुर्भे स्टोअर, नमुंमपा शाळा क्र.११६ सानपाडा या ३ महानगरपालिका शाळांचा १०० टक्के निकाल लागलेला आहे.

या २३ शाळांमधून राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय नमुंमपा शाळा क्रमांक १०४, आंबेडकर नगर, रबाळे येथील अंशिका अंगद यादव या विद्यार्थिनीने ९५ टक्के गुण संपादन करीत महानगरपालिका शाळांमध्ये सर्वप्रथम क्रमांकाचे सर्वोत्तम गुण संपादन केले. नमुंमपा शाळा क्रमांक ११८ पावणे येथील साहिल युवराज जाधव हा विद्यार्थी ९४.६० टक्के गुण संपादन करुन द्वितीय क्रमांकाचा आणि नमुंमपा शाळा क्रमांक १२१, कुकशेत येथील विद्यार्थिनी रुक्कया गुफरान अन्सारी हिने ९४ टक्के गुण संपादन करीत तृतीय क्रमांकाचा बहुमान पटकाविला.

नमुंमपा शाळेतील विद्यार्थ्यांनी शालांत परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी केल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन केले जात आहे. नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे आणि शिक्षण अधिकारी अरुणा यादव यांनी उज्वल यश संपादन करणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. तसेच शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांचेही अभिनंदन करीत भविष्यातील अधिक चांगल्या कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

नमुंमपा शिक्षण विभागामार्फत सर्व महानगर पालिका माध्यमिक शाळांना २१ मार्गदर्शक अपेक्षित संच पुरविण्यात आले होते. तसेच दिवाळीच्या सुट्टीत आणि शाळा सुटल्यानंतर दररोज एक तास विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रत्येक शाळेला सराव प्रश्नसंच उपलब्ध करुन देऊन प्रश्नसंचाचा उपयोग करुन शाळा स्तरावर सराव परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी शालेय स्तरावर मुख्याध्यापक व शिक्षकांनी मेहनत घेतल्याची फलश्रूती म्हणजे नवी मुंबई महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश असून याबद्दल विद्यार्थ्यांसह त्यांच्या शिक्षकांचे ही अभिनंदन करण्यात येत आहे.

# ठाणे शहरात संदीप लेले करणार शिंदेसेना, शरद पवार गटाचा सामना

## जुन्यांना हटवून नवीन शहराध्यक्षांची नियुक्ती

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१४, ठाणे :** आगामी महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपने ठाणे जिल्ह्यातील काही शहराध्यक्षांना हटवून त्यांच्या जागी नवीन शहराध्यक्षांची नियुक्ती केली. ठाणे शहरासाठी पुन्हा संदीप लेले यांच्या नावाला पसंती देण्यात आली. संजय वाघुले हे विद्यमान शहराध्यक्ष होते. जिल्ह्यात इतर पक्षातील माजी नगरसेवकांना गळाला लावत आपल्या पक्षात प्रवेश देण्याची मालिका शिंदेसेनेकडून सुरू आहे.

११ शरद पवार गटाच्या माजी नगरसेवकांना पक्षात प्रवेश

ठाणे महापालिका क्षेत्रातील कळवा भागातील शरद पवार गटाच्या ११ माजी नगरसेवकांना पक्षात प्रवेश देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आ. जितेंद्र आव्हाड यांना धक्का दिला. त्याचबरोबर या नगरसेवकांना आपल्या पक्षात घेण्याच्या तयारीत असलेल्या भाजपला शह दिला. जिल्ह्यात शिंदेसेना आणि भाजप या दोन्ही मित्र




पक्षांमध्येच पालिकेतील सत्तेची लढाई सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे. त्यात भाजपने आपले नवे शिलेदार देऊन नवी खेळी केली.

ठाणे शहराध्यक्ष पदावरून संजय वाघुले यांना हटवून त्यांच्या जागी संदीप लेले यांची नियुक्ती केली आहे. ठाणे ग्रामीण अध्यक्षपदावर जितेंद्र डाकी यांना कायम ठेवले. भिवंडी शहराध्यक्ष पदावरून ॲड. हर्षल पाटील यांना हटवून त्यांच्या जागी रविकांत सावंत, मीरा-भाईंदर शहराध्यक्ष पदावरून किशोर शर्मा यांना हटवून त्यांच्या जागी दिलीप जैन, नवी मुंबई शहराध्यक्ष पदावरून रामचंद्र घरत यांना हटवून त्यांच्या जागी डॉ. राजेश पाटील, कल्याण शहराध्यक्ष पदावरून नरेंद्र सूर्यवंशी यांना हटवून त्यांच्या जागी नंदू परब आणि उल्हासनगर शहराध्यक्ष पदावरून प्रदीप रामचंदानी यांना हटवून राजेश वधारिया यांची नियुक्ती केली.

# पुणे महानगरात अद्याप अनेक ठिकाणी नालेसफाई ड्रेनेजचे कामकाज राम भरोसे

## ''आम आदमी पार्टी'' चा आरोप !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४ पुणे :** पावसाळा तोंडावरती आला तरीसुद्धा पालिकेने कुठलीही नालेसफाई अद्याप कामे चालू केलेली नाही. सदर ३४ गावांमध्ये नालेसफाई ड्रेनेज लाईन चा मोठा विषय असून पालिकेचे कामकाज हे राम भरोसे चालू असल्यामुळे आत्ता सर्वोच्च न्यायालयाने निवडणुकीच्या संदर्भात आदेश पारित केले असून तातडीने निवडणूक घेतल्यानंतर नागरिकांची कामे होण्यास अधिक मदत होईल परंतु निवडणुका जसे जसे लाबणीवरती जात आहे. तस तसे नागरिकांच्या समस्या ह्या दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. अधिकारी कोणालाही जुमानण्यास तयार नाही. त्यामुळे नागरिकांचा आवाज उचलणार तरी कोण असा प्रश्न उद्भवला आहे.

याचंच उदाहरण म्हणून आत्ताच झालेल्या आवकळी पावसामुळे नागरिकांच्या घरात ड्रेनेजचे पाणी मोठ्या प्रमाणात घुसले आंबेगाव खुर्द सच्चाई माता परिसर अटल १२ या ठिकाणी छोट्या पावसामुळे अशी परिस्थिती उद्भवत असेल तर मोठा पाऊस आला तर काय होईल. नागरिकांना त्याच ठिकाणाहून स्थलांतरित करण्याची वेळ ही प्रशासनावरती ओढवली जाणार आहे. तातडीने नालासफाई ड्रेनेज लाईन सर्व कामे तातडीने या भागांमधून पूर्ण केली पाहिजे, असे वक्तव्य आम आदमी पार्टी शहराध्यक्ष प्रशांत कांबळे सामाजिक न्याय विभाग यांनी व्यक्त केले. पुणे



शहरांमध्ये अनेक ठिकाणी पाणी साचल्याचे आपल्याला दिसून आले. सरकार पालिका बजेट आखते परंतु ते बजेट कोणाच्या खिशात जातं बजेटनुसार नागरिकांची कामे झाले पाहिजे ते होताना मात्र दिसत नाही. असा आरोप आप कडून करण्यात येतोय.

# उल्हासनगरमध्ये मोटारसायकल चोरी प्रकरणी आरोपी अटकेत, ८ चोरीच्या दुचाकी जप्त



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१२, उल्हासनगर (ठाणे) :** शाखा, युनिट ४, उल्हासनगर पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे मोटारसायकल चोरी प्रकरणी मोठी कारवाई करण्यात आली. अमरडाय कंपनीजवळ, उल्हास नदीकडे जाणाऱ्या रस्त्यावर ६ ते ७ इसम चोरीच्या दुचाकींसह फिरत असल्याची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बांडे व त्यांच्या पथकाने सापळा रचून संशयित इसम हर्षद भरत सुपे (वय १९, रा. गायकवाड पाडा, विठ्ठल मंदिराजवळ, उल्हासनगर-५) याला अटक केली.

अधिक चौकशीत त्याने आपला अल्पवयीन साथीदार, विधी संघर्षीत बालक (रा. आंबिवली) याच्यासोबत मिळून पडघा, कल्याण तालुका व वर्तकनगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून एकूण ८ चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या असून, त्यांची एकूण किंमत सुमारे ३,९०,०००/- रुपये इतकी आहे.

जप्त दुचाकींचा तपास घेतला असता, त्यांच्याशी संबंधित गुन्हे विठ्ठलवाडी, हिललाईन, कल्याण तालुका, पडघा, व वर्तकनगर या विविध पोलीस ठाण्यांत दाखल असल्याचे निष्पन्न झाले. विधी संघर्षित बालकास त्याच्या पालकांच्या ताब्यात समजपत्रासह देण्यात आले असून, मुख्य आरोपी हर्षद सुपे याला पुढील कारवाईसाठी विठ्ठलवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव व सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध-१) शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या ऑपरेशनमध्ये गुन्हे शाखा, घटक-४, उल्हासनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बांडे, पवार, पोहवा थोरवे, तसेच कर्मचारी गणेश गावडे, योगेश वाघ, मंगेश जाधव, अमर कदम, रितेश वंजारी, पोशि संजय शेरमाले, प्रसाद तोंडलिकर, रामदास उगले आणि चालक पोशि अविनाश पवार यांचा समावेश होता.

# थोडक्यात

## अतिटच्या सुशिलाताई परांजपे विद्यालयाची इ.१० वीच्या १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१३, खंडाळा (सातारा) :** सौ.सुशिलाताई परांजपे विदयालय, अतिट मधील फेब्रुवारी, मार्च २०२५ मध्ये झालेल्या एस.एस.सी.बोर्ड परीक्षेत एकूण ३८ विद्यार्थी परीक्षेला बसले. सर्व विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊन शाळेची १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखण्यात शाळेला यश मिळाले. यात विशेष श्रेणीमध्ये १७ विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये १४ विद्यार्थी व द्वितीय श्रेणीमध्ये ०७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

या परीक्षेत शाळेत प्रथम येण्याचा मान पुढील विद्यार्थ्यांनी मिळवला वेदांत शंकर जाधव ९५.८०%, प्रणाली विजय लेकावळे ९०%, वैष्णवी संजय जाधव ८८%, आदिती संतोष रवळेकर ८६.६०%, संचिता महेंद्र जाधव ८५.४०% आणि समृद्धी सतीश दुधाने ८५%.

नुकतेच विविध शिष्यवृत्ती परीक्षांचे निकाल जाहीर झाले यामध्ये विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.इ.८वी.पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत दोन विद्यार्थी पात्र झाले. एन.एम.एम.एस. परीक्षेत ०३ विद्यार्थी पात्र ठरले व त्यापैकी ०२ विद्यार्थ्यांना सारथी शिष्यवृत्ती प्राप्त झाली.भारती विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता ८वी. प्री - इंटरमिजिएट परीक्षेत कु.श्रावणी हनुमंत लिमण या विद्यार्थिनीने राज्यात प्रथम क्रमांक मिळवला.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे संस्थेचे चेअरमन डॉ.विनय जोगळेकर व्हा. चेअरमन ॲड. बाळकृष्ण पंडित सर,सचिव रमेश देशपांडे सर आणि सर्व संचालक यांनी अभिनंदन केले.

## कै.गंगाबाई पोतना सब्बनवार विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९५.८३ टक्के

**अक्षराज : दत्ता हमंद**

**०दि.१३, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील कै. गंगाबाई पोतना सब्बनवार विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९५.८३टक्के लागला असून विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा मान कु.वैभवी परमेश्वर धरमुरे (८२.२०) हिने पटकाविला आहे तर द्वितीय कु. स्वराली गायकवाड (८१.२०टक्के) कु. श्रीजा कपूरवार (८१.२०टक्के) व तृतीय क्रमाने कु. सृष्टी वानोळे ८०.६० गुण घेऊन यशस्वी झाल्या आहेत.

एकूण ४८विद्यार्थिनी पैकी विशेष प्राविण्यासह विद्यार्थिनी कु.मनिषा धरमुरे, कू महादेवी मोरे, कु.शामला ढगे, कु.दिव्याराणी गुडलावार कु. आफरीन बाबा शेख अशा एकूण ९विद्यार्थिनी, तर प्रथम श्रेणीत २२ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थिनीचे संस्थाध्यक्षा श्रीमती कुसुमताई सब्बनवार, सचिव डॉ प्रशांत सब्बनवार, मुख्याध्यापक कल्याण गायकवाड, परीक्षा विभाग प्रमुख रविकांत शिंदे, वर्गशिक्षिका मेघा सब्बनवार, माधव शिवपनोर, वर्षा येनगे, साईनाथ बाबळीकर, दत्तात्रय अर्धापूरे, आकाश अर्जुने, आनंद कवडेकर , प्रा श्रीनिवास गोविंदलवार प्रा.महेश कोंडावार व शाम पवार आदींनी अभिनंदन व स्वागत केले. सब्बनवार विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली असून कॉपीमुक्त वातावरणात पार पडलेल्या परीक्षेत आपल्या बुद्धीचा कस लाऊन यश मिळवल्याने शिक्षणप्रेमी नागरिकांतून शाळा आणि संस्थेचे कौतुक होत आहे.

## पंचशील हायस्कूलचा ८३ टक्के निकाल





**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१३, हदगाव (नांदेड) :** शहरातील अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त मात्रशाळा म्हणून सर्वदूर प्रसिद्ध असलेल्या तसेच तालुक्यातील शिस्तप्रिय व ग्रामीण भागातील सर्वात जास्त विद्यार्थी संख्या परीक्षेला बसवणाऱ्या पंचशील विद्यार्जन माध्यमिक विद्यालयाने आपल्या निकालाची यशस्वी परंपरा कायम ठेवत शाळेचा निकाल ८३.७७ टक्के लागला आहे.

या शाळेने नुकत्याच झालेल्या एसएससी परीक्षेसाठी ४२० विद्यार्थी बसवले होते त्यापैकी ३५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले या शाळेतील कु.अंजली गायकवाड ९७.६० टक्के गुण मिळवत हदगाव तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला कु. शिंदे शाश्वती ९५ टक्के,नरवाडे लक्ष्मीकांत ९४.६० टक्के या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला ९० टक्याच्यावर ८ तर ८९ टक्क्याच्यावर ५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले विशेष प्राविण्यात ६६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. संस्थेचे सचिव सुनील सोनूले व सर्व संचालक मंडळ मुख्याध्यापक गोपाळ बंड्रेवार व सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## कल्याण पूर्व येथील विजयनगर उतारावर पुन्हा एकदा डंपरचा अपघात ! सुदैवाने जीवितहानी टळली

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१४, कल्याण (ठाणे):** कल्याण पूर्वेतील विजयनगर उतारावर पुन्हा एकदा डंपर अपघात झाला आहे. काही दिवसांपूर्वीच याच ठिकाणी एका डंपरच्या अपघातात अनेक नागरिक जखमी झाले होते आणि वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.



आज सकाळी घडलेल्या नव्या अपघातात, एका भरधाव डंपरने रस्त्यावरील डिवायडरला जोरदार धडक दिली. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी डिवायडर आणि लाईट पोलचे मोठे नुकसान झाले आहे. अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती, मात्र पोलिस आणि महापालिका कर्मचाऱ्यांच्या तत्परतेने परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. वारंवार या उतारावर होणाऱ्या अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं असून प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. या ठिकाणी वाहने खाली उतरताना वारंवार ब्रेक फेल होणे किंवा गती नियंत्रण नसणे ही समस्या ठरत असल्याने यावर कायमस्वरूपी उपाय करणे गरजेचे आहे.